ज्येष्ठ साहित्यिक/नाटककार/गायक पु.ल. देशपांडे, ग.दि.माडगूळकर, सुधीर फडके बाबूजी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने लेखन, काव्य व संगीत कार्यशाळांच्या आयोजन खर्चास मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१८/प्र.क्र.३७०/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण ८२१८/प्र.क्र. २५७/सां.का.४, दिनांक ६ डिसेंबर, २०१८
२) शासन ज्ञापन, मराठी भाषा विभाग क्र. संकीर्ण २०१८/प्र.क्र.१७/२०१८/ भाषा-३, दिनांक २७ सप्टेंबर, २०१८
३) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.स/ कार्यशाळा/ २६३४, दिनांक २६ जुलै, २०१९

प्रस्तावना :-

ज्येष्ठ साहित्यिक/गायक/संगीतकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभाग व मराठी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करावयाच्या लेखन, काव्य व संगीत या विषयावरील एकूण १०० कार्यशाळांच्या आयोजनास उपर्निर्दिष्ट दिनांक ६ डिसेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सन २०१८-१९ या वर्षी ५५ कार्यशाळांचे आयोजन संपन्न झाले आहे. आता उर्वरित ४५ कार्यशाळांचे आयोजन करण्यासाठी येणाऱ्या तपशीलवार खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

ज्येष्ठ साहित्यिक/गायक/संगीतकार पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर व सुधीर फडके यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने सन २०१९-२० या वित्तीय वर्षात उर्वरित एकूण ४५ लेखन, काव्य व संगीत कार्यशाळांचे आयोजन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक कार्यशाळा आयोजनासाठी येणाऱ्या रू. १.०० लक्ष इतक्या खर्चास खालील तपशिलात नमूद केल्यानुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	खर्चाचा तपशील	रक्कम रुपये
१.	अ) लेखन कार्यशाळा- मुख्य मार्गदर्शक (मानधन व प्रवास खर्च)- एकूण रू. १२,०००/- सहमार्गदर्शक ((मानधन व प्रवास खर्च) -एकूण रू. १२,०००/- ब) काव्य कार्यशाळा- मुख्य मार्गदर्शक (मानधन व प्रवास खर्च)- एकूण रू. १२,०००/- सहमार्गदर्शक ((मानधन व प्रवास खर्च)-एकूण रू. १२,०००/- क) संगीत कार्यशाळा- मुख्य मार्गदर्शक (मानधन व प्रवास खर्च) एकूण रू १२,०००/- सहमार्गदर्शक/दोन वादक (मानधन व प्रवास खर्च) एकूण रू. १२,०००/-	७२,०००/-
२.	समन्वयक मानधन	७,०००/-
३.	जाहिरात प्रसिध्दी - (वृत्तपत्र जाहिरात, एफ.एम. आकाशवाणी)	१२,०००/-

४.	बोर्ड, बॅनर इत्यादी छपाई (महाविद्यालय)	७,०००/-
५.	बोर्ड, बॅनर, जाहिराती डिझाईन	१,०००/-
६.	इतर अनुषंगिक खर्च	१,०००/-
	एकूण खर्च	**१,००,०००/-**

२. उपरोक्त खर्चाच्या बाबी या ढोबळ स्वरुपाच्या असून एक लक्ष रुपये मान्यतेच्या अधीन राहून काही बदल करावयाचा झाल्यास, समन्वयकाच्या सल्ल्यानुसार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना खर्चाच्या बाबींमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार राहतील.

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. मराठी भाषा विभागाने उपर्निर्दिष्ट क्र. २ येथील ज्ञापनान्वये मराठी भाषा विभागाच्या मागणी क्र. झेडएफ-०१, मुख्य लेखाशिर्ष २०५२ सचिवालय - सर्वसाधारण सेवा, ०९०, सचिवालय, (००) (०४) मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी हाती घ्यावयाचे उपक्रम (कार्यक्रम), ५० इतर खर्च (२०५२ ५२३२) या लेखाशिर्षाखालील रूपये २.०० कोटी (अक्षरी रूपये दोन कोटी फक्त) इतका निधी जन्मशताब्दी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी या विभागास अभिहस्तांकित करण्याचे मान्य केले आहे. त्यानुषंगाने उपरोक्त नमूद कार्यक्रमांचा खर्च मागणी क्र. झेडएफ-०१, मुख्य लेखाशिर्ष २०५२ सचिवालय - सर्वसाधारण सेवा, ०९०, सचिवालय, (००) (०४) मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी हाती घ्यावयाचे उपक्रम (कार्यक्रम), ५० इतर खर्च (२०५२ ५२३२) या लेखाशिर्षाखालील सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरीता मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. २७ (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर प्रकरणी वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/ प्र.क्र.९२/ अर्थ-३, दि. ०८ जुलै, २०१९ मधील सर्व परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१८१०४९१३६७२३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vilas Ramrao Thorat

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tourism And Cultural Affairs Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e6cc4d20348a52de465c7c34a61591bbe69b747ae11457103a0cfb9a57fc6ce6, serialNumber=cb03c92b399cc89310bf1378c184d97a4b7b9b98e926ea8e71dd7bc9cb273631, cn=Vilas Ramrao Thorat
Date: 2019.09.20 13:16:39 +05'30'

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. सह सचिव (मराठी भाषा) विभाग, मंत्रालय, मुंबई
४. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
६. संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय (माहिती / वृत्त), मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. महालेखापाल (लेखापरीक्षा) - १, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०. महालेखापाल (लेखापरीक्षा) - २, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. निवड नस्ती, सां.का.४.